# कोविडनंतर देश बलवान व सक्षम करण्याची जबाबदारी प्रत्येकाची- प्राचार्य अरविद चौधरी

देशावर कोविडचे संकट आहे देशातील उद्योग, व्यवसाय,व्यापार, शेती,आरोग्य,शिक्षण क्षेत्रावर मोठा परिणाम झालेला आहे.राष्ट्र पुन्हा बलवाल व सक्षम करण्याची जबाबदारी आम्हा प्रत्येक भारतीयांची आहे असे प्रतिपादन बोदवड महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ अरविंद चौधरी यांनी स्वातंत्रदिनी केले

बोदवड येथील कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात भारतीय स्वातंत्र्याचा 74 वा वर्धापन दिन प्राचार्य डॉ अरविद चौधरी यांच्या हस्ते ध्वजरोहण करून साजरा करण्यात आला.

केंद्र व राज्यशासनाच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करून भारतीय स्वातंत्र्याचा वर्धापनदिन महाविद्यालयाच्या प्रांगणात उत्साहात साजरा करण्यात आला या निमित्ताने कोविड19 दरम्यान शासनाद्वारे कोविड सेंटर बोदवड येथे नियुक्ती करण्यात आलेले महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचारी श्री जितेंद्र बडगुजर व श्री राजेंद्र मोपरी यांचा कोविड योद्धा म्हणून सन्मान प्राचार्य अरविद चौधरी यांनी केला तसेच कोविड19 बाबत घ्यावयाची काळजी, वृक्षसंवर्धन, जलसंधारण,जलशक्ती अभियान, स्वछता अभियान संदर्भात प्रचार व प्रसार बाबत भविष्यातील कार्याचा आराखडा नियोजनवर एकत्रित चर्चा करण्यात आली.

या प्रसंगी उपप्राचार्य प्रा डी एस पाटील, नॉक समनव्यक डॉ चेतन शर्मा, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ अनिल बारी, डॉ एम डी वराडे, विद्यार्थी विकास अधिकारी प्रा नरेंद्र जोशी, डॉ वही पी चौधरी, राष्ट्रीय छात्र सेना समनव्यक डॉ मनोज निकाळजे, वसतिगृह अधीक्षक डॉ रत्ना जवरस, कार्यालय अधीक्षक श्री बाबुराव हिवराळे यांचेसह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

